FROM : SHRI XEROX JALNA FAX NO. :02482 224568 11 Feb. 2013 12:25PM P1

022-22886124

जावक क्रमांक/ 478 /2013
जिल्हा सरकारी वकील कार्यालय,
जालना.
दिनांक 11/02/2013

प्रति,
श्री स्वप्निल कापडणीस,
कार्यासन अधिकारी,
कार्यासन ?, विधी व न्याय विभाग मंत्रालय,
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई 400032.

विषय :- नागरिकांची सनद प्रसिध्द करणे हा विषय सन 2012-13 साठीच्या KRA मध्ये प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- आपले कार्यासीन पत्र क्रमांक केआरए 2012/प्र.क्र.10/का. 07 दि. 17 जानेवारी 2013.

माननीय महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र या कार्यालयास दिनांक 07/02/2013 रोजी प्राप्त झाले. त्याअनुषंगाने आपण मागविण्यात आलेली या कार्यालयाची नागरीकांची सनद तयार करुन त्याची प्रत व माहीती सीडी (PDF) स्वरुपात आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

करीता माहीतीस्तव.

आपला विश्वासु,

(मुकुंद लक्ष्मणराव कोल्हे)
जिल्हा सरकारी वकील व
सरकारी अभियोक्ता, जालना

# जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, कार्यालय,
# जिल्हा व सत्र न्यायालय, जालना, जिल्हा जालना

नागरिकांची सनद

**प्रस्तावना -** जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथील कक्ष क्रमांक 108 मध्ये स्थित जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता या कार्यालयातंर्गत जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता व सहा सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नियुक्तीस अधीन राहून कार्यरत आहेत.

जिल्हा सरकारी वकील कार्यालय अंतर्गत जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता व सर्व सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता जालना यांच्या नियुक्त्या दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 च्या आदेश 27 व फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम 24 (3) व महाराष्ट्र विधी अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम 13 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागातर्फे नियुक्ती अधिसूचनेत विहित केलेल्या मुदतीसाठी केल्या जातात. या कार्यालयात जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक एक व कनिष्ठ लिपीक चार व शिपाई एक असा कर्मचारी वृंद माननीय प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना यांच्या आदेशावरुन कार्यरत असतात.

## कार्यालयातंर्गत कामकाजाचा तपशील

**फौजदारी कज्जे.** - सत्र न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारच्या फौजदारी सत्र खटले, विशेष सत्र खटले यामध्ये सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अभियोग पक्षाचे काम पाहतात. तसेच फौजदारी अपील व रिव्हीजन यामध्ये प्रतिवादी महाराष्ट्र शासन यांचेवतीने बाजू मांडण्याचे काम सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता करतात. तसेच सत्र न्यायालयापुढे येणारी अटकपूर्व व नियमित जामीन अर्ज यामध्ये गैरअर्जदार महाराष्ट्र शासन यांचेवतीने सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता हजर होवून संबंधित गुन्हयातील तपासीक अधिकारी यांचा अहवाल व तपासाची कागदपत्रे न्यायालयासमक्ष सादर करुन बाजू मांडली जाते. तसेच फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणात तपासीक अधिकारी वा तपास यंत्रणेला आवश्यक त्या प्रकरणात विधी विषयक अभिप्राय सरकारी अभियोक्ता देतात. सत्र न्यायालयातील सर्व प्रकारच्या फौजदारी कामकाजाचे वितरण सर्व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांना समप्रमाणात सरकारी अभियोक्ता यांच्याकडून केल्या जाते. तसेच आरोपी निर्दोष मुक्ततेच्या विरोधात अपील प्रस्ताव, जामीन रद्दबातल करणेबाबत अर्ज व आवश्यक त्या प्रकरणात माननीय उच्च न्यायालयात रिव्हीजन व अपील दाखल करणेबाबतचे प्रस्ताव माननीय सहसचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांचेकडे सादर केले जातात.

**दिवाणी प्रकरणे. -** जिल्हा न्यायालयासमोर येणारे महाराष्ट्र शासन प्रतिवादी असलेल्या दिवाणी अपीलामध्ये महाराष्ट्र शासनातर्फे हजर होवून जिल्हा सरकारी वकील व सहाय्यक सरकारी वकील बाजू मांडतात. तसेच दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात महाराष्ट्र शासन व शासकीय अधिकारी हे प्रतिवादी असतात. त्या प्रकरणांमध्ये जिल्हा सरकारी वकील व सहाय्यक सरकारी वकील हजर होवून लेखी जबाब दाखल करणे, साक्षपुरावा व युक्तीवाद करुन शासनाची बाजू मांडतात. तसेच भू-संपादन मावेजा प्रकरणामध्ये महाराष्ट्र शासन व विशेष भू-संपादन अधिकारी यांचेवतीने हजर होवून लेखी जबाब, साक्षीपुरावा व युक्तीवाद करुन जिल्हा सरकारी वकील व सहाय्यक सरकारी वकील बाजू मांडतात. दिवाणी प्रकरणांचे सर्व कामकाजाचे वितरण सहाय्यक सरकारी वकील यांना समप्रमाणात जिल्हा सरकारी वकील यांचेवतीने केले जाते. महाराष्ट्र शासनाचे विविध विभागास विधी विषयक अभिप्राय जिल्हा सरकारी वकील देतात. शासनाच्या अंशत: वा पूर्णत: विरोधात निकाली गेलेल्या दिवाणी स्वरुपाच्या प्रकरणात व भू-संपादन मावेजा प्रकरणात अपील दाखल करण्याचे प्रस्ताव माननीय सहसचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांच्याकडे सादर केले जातात.

जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता तसेच सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता हे शासनाच्या विधी विषयक कामकाजाचे नियम 1984 अन्वये घालून दिलेल्या कार्य पध्दतीनुसार महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रशासकीय अधिपत्याखाली काम पाहतात.

या कार्यालयाबाबत यासोबत जोडलेल्या विवरण पत्र 1 व 2 मध्ये माहिती दिली आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम अन्वये माहितीचा अधिकार - जबाबदा-या व कर्तव्येबाबत तपशील दिला आहे.

**(मुकुंद लक्ष्मणराव कोल्हे)**
जिल्हा सरकारी वकील व
सरकारी अभियोक्ता, जालना

विवरणपत्र १

नागरिकांची सनद (Citizen Charater)

| अ न | कार्यालयाचे नाव | जनतेस देण्यात येणाऱ्या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्राची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकऱ्याचे नाव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहीत/ सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपिल करण्याचा विहीत कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता कार्यालय जालना | जनतेकडुन माहीतीच्या अधिकार अधिनियमा अंतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे | माहीतीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करावा, अर्जावर १० रुपये मुल्याचे कोर्ट फी तिकीट लावावे | कार्यालयात पदनिर्देशित केलेले संबंधीत माहीती अधिकारी | माहीती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसात | अपीलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्या पासुन ३० | |
| २ | | जनतेकडुन माहीतीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत आलेल्या अपीलांना उत्तरे | माहीतीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत विहीत केलेल्या नमुन्यात अर्ज करावा, अर्जावर २० रुपये मुल्याचे कोर्ट फी तिकीट लावावे | नियुक्त केलेले संबंधीत अपीलीय प्राधिकारी | अपील प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांक पासुन ३० दिवस | -- | महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी/मा. सहसचिव , विधी व न्याय विभाग औरंगाबाद |

मुकुंद एल. कोल्हे

जालना

विवरणपत्र २

| अ न | कार्यालयाचे नाव | जनतेस देण्यात येणाऱ्या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्राची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकऱ्याचे नाव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहीत/ सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपिल करण्याचा विहीत कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता कार्यालय जालना | १)दिवाणी व फौजदारी कज्जे व भुसंपदान प्रकरणात महाराष्ट शासन व अभियोग पक्षाचे बाजु न्यायालयात मांडणे<br>२) महाराष्ट शासनाचे विधी व न्याय विभागाचे वतीने दिवाणी प्रकीया संहीता १९०८ च्या आदेश २७ व फौजदारी प्रकीया संहीताचे कलम २४(३) व महाराष्ट विधी अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १३अन्वये महाराष्ट शासन जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता व अन्य सहायक सरकारी | दिवाणी स्वरुपाच्या कामकाजात सरकारी पक्षातर्फे मा.न्यायालयात बाजु मांडणे व महाराष्ट शासनाच्या जिल्हयातील सरकारी कार्यालयांना विधी विषयक अभिप्राय व फौजदारी प्रकरणात विधी विषयक अभिप्राय दिले जातात.<br>२) फौजदारी प्रकरणात अभियोग पक्षातर्फे मा.न्यायालयात बाजु मांडणे व खटल्यातील फिर्यादी व साक्षीदार व तपासीक अधिकारी यांना आवश्यक ते सहाय्य करणे<br>३) दिवाणी स्वरुपाच्या प्रकरणात न्यायालयाचा निकाल शासनाच्या अंशत: वा पुर्णत: विरुध्द गेल्यास अपीलीय न्यायालयात अपील करणे बाबत मा.सह सचिव विधी व न्याय यांच्याकडे अपील प्रस्ताव सादर करणे. | जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता व सर्व सहाय्यक सरकारी वकील व अति.सरकारी अभियोक्ता, जालना. | मुदतीत व तत्परतेन प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेवुन कार्यवाही केली जाते. | -- | मा. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग , मंत्रालय, मुंबइ<br>२)मा. सहसचिव, विधी व न्याय विभाग , जुनी उच्च न्यायालय ईमारत, अदालत रोड औरंगाबाद. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वकील व अति.सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती करतात. नियुक्त करण्यात आलेले सर्व विधी अधिकारी शासनाच्या विधी विषयक कामकाजाचे नियम १९८४ चे अनुसार दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे कामकाज पाहतात.<br>३)जिल्हा सरकारी वकील हे कार्यालय प्रमुख म्हणुन कार्यरत असतात व ते जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता यांनामहाराष्ट्र विधी अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम व शासनाच्या विधी विषयक कामकाजाचे नियम १९८४ अन्वये विहीत केलेल्या अधिकार व कर्तव्य याप्रमाणे कामकाज सांभाळतात. | ४) फौजदारी प्रकरणांमध्ये अभियोग पक्षाच्या विरोधात निकाल गेल्यास व आरोपी निर्दोष मुक्ततेच्या विरोधात अपील दाखल करणेसाठी मा.सहसचिव विधी व न्याय विभाग औरंगाबाद यांचयाकडे अपील प्रस्ताव दाखल करणे. | | | | |

मुकुंद एल. कोलै

## माहितीचा अधिकार - जवाबदा-या /कर्तव्य

### तपशिल

| | | |
|---|---|---|
| 01 | कार्यालयाचे नांव व पत्ता | जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, जालना,<br>द्वारा कक्ष क्रमांक 108, जिल्हा व सत्र न्यायालय इमारत, सर्व्हे नंबर 488, जालना, जिल्हा जालना.<br>दुरध्वनी क्रमांक :- 02482 - 225850<br>दुरध्वनी क्रमांक :- 02482 225833<br>हे कार्यालय जालना जिल्हा मुख्यालयी आहे. |
| 02. | कामकाजाची व्याप्ती | 1) दिवाणी व फौजदारी तसेच भू संपादनाच्या प्रकरणात शासनाची बाजु मांडणे. |
| | | 2) सरकारी वकीलांनी काम पाहिलेल्या फौजदारी प्रकरणासाठी मानधनाची देयके तयार करणे व भुसंपादन प्रकरणाची फिसची देयके संबंधित विभागास मंजुरीस्तव पाठविणे. |
| 03. | जिल्हा सरकारी वकीलांचे | 1) जिल्हा सरकारी वकील यांना कार्यालय प्रमुखाचे सर्व अधिकारी व कर्तव्य अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.<br>कार्यालयातील कामकाज पारदर्शी व गतीमान चालविण्यासाठी आवश्यक उपाय योजना करणे. |
| | | 2) कार्यालयातील इतर सहायक सरकारी वकीलांना फौजदारी, दिवाणी व भू संपादनाची प्रकरणे चालविण्यासाठी सम प्रमाणात वाटप करणे. |
| | | 3) या कार्यालयाकडुन इतर शासकीय कार्यालयांनी अभिप्राय मागितल्यास त्यास कायदेशीर अभिप्राय देणे. |
| | | 4) माननीय जिल्हा व सत्र न्यायालयाने पुरविलेल्या वर्ग-3 व 4 च्या कर्मचा-यांना विभागा वाटप करुन देवुन त्यांच्याकडुन संबंधित काम सुरळीतपणे करुन घेणे. तसेच निकाली प्रकरणामध्ये अपिलाच्या संदर्भातील कार्यवाही कामी योग्य कागदपत्रे पुरवुन आवश्यक त्या सर्व प्रकरणामध्ये अपील दाखल करण्याची कार्यवाही करुन घेणे. |
| 04. | विधी अधिका-यांची नावे व भ्रमण यंत्र क्रमांक | 1) श्री. मुकुंद.एल.कोल्हे - जिल्हा सरकारी वकील - 09422723660<br>2) श्री. डी. एम. गोषिक - सहाय्यक सरकारी वकील -09890197999<br>3) श्री. यु. बी. राठोड - सहाय्यक सरकारी वकील -09766107533<br>4) श्री. पी.एन.जाधव - सहाय्यक सरकारी वकील -09850983362<br>5) श्रीमती व्ही.एल.मुर्कीम-सहाय्यक सरकारी वकील -09373190775<br>6) श्री.एस.रहेमतअली - सहाय्यक सरकारी वकील-09890817775 |

| | | |
|---|---|---|
| 05. | कर्मचारी वृंद<br>वरिष्ठ लिपीक 1 पद<br>कनिष्ठ लिपीक 4 पद<br><br><br><br>शिपाई 1 पद | 1) श्री. व्ही.एस.अकोले - वरिष्ठ लिपीक<br>2) श्री. डी.व्ही.चव्हाण - कनिष्ठ लिपीक<br>3) श्री. एस.एल.चिलवंत - कनिष्ठ लिपीक<br>4) श्री. एन.डि.गाढवे - कनिष्ठ लिपीक<br>5) श्री. जी.व्ही.जोशी- कनिष्ठ लिपीक<br>6) श्री. वाय.एस.टकले - शिपाई |
| 06. | माहिती अधिकारी | श्री. पी.एन.जाधव - सहाय्यक सरकारी वकील - 09850983362 |
| 07. | अपिलीय अधिकारी | श्री. मुकुंद.एल.कोल्हे - जिल्हा सरकारी वकील -09422723660 |
| 08. | कामकाज नोंदवहया | सत्र प्रकरणांची नोंदवही, दिवाणी प्रकरणांची नोंदवही भू संपादन प्रकणांची नोंदवही, निकाल नोंदवहया, अपील नोंदवहया प्रकरण वाटप नोंदवही. जामीन वाटप नोंदवही, आवक जावक नोंदवही, टपाल वही, मुद्रांक वही. |
| 09. | प्रशासकीय व वित्त | लेखा, कोषागार, रोकड, वेतन पट, अनुदान गोपनिय, अग्रिम, अभिप्राय, नोंदवहया |
| 10. | ग्रंथालय | या कार्यालयात विविध विधी विषयक कायदयाची पुस्तके माननीय जिल्हा न्यायालयाकडुन व शासनाकडुन पुरविण्यात आलेले असुन ते अनुक्रमे ठेवण्यात आलेली आहे. |
| 11. | संगणक, झेरॉक्स, फॅक्स मशिन | या कार्यालयात 1 झेरॉक्स यंत्र, 1 फॅक्स तंत्र तसेच 3 संगणक व 1 टपाल तिकिटाचे फ्रॅकींग यंत्र शासनाने पुरविलेले आहे. |

टिप - या कार्यालयाने अभिलेख वर्षानुक्रमे ठेवलेले असुन कार्यालयास कोणत्याही व्यक्तीने माहिती मागितल्यास ती शक्य तितक्या लवकर उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केलेली आहे. या कार्यालयातील अभिलेख सॉफ्टवेअर अभावी संगणकीकृत करण्यात आलेले नाही.

या कार्यालयाने कार्यालयाच्या दर्शनी भागावर माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नावांचे फलक व भ्रमण यंत्र क्रमांकासह फलक लावण्यात आलेले आहे.

(मुकुंद लक्ष्मणराव कोल्हे)
जिल्हा सरकारी वकील व
सरकारी अभियोक्ता, जालना